वाचा :- 1) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चे कलम 66 (1)
2) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,दिंडोरी यांचे कडिल पत्र क्रं.जा.क्र.पंसदिं/आस्था-3 /781/2018 दि. 26/11/2018
3) श्रीमती. छाया पदमाकर वटारे,से.नि.आरोग्य सहाय्यिका (म) प्रा.आ.केंद.वरखेडा यांचा स्वेच्छा सेवानिवृत्ती नोटीस 01/10/2018
4) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक - 12 /12 /2018

आदेश

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/956 /2018
दिनांक - 13 /12 /2018

श्रीम. छाया पदमाकर वटारे, आरोग्य सहाय्यिका (महिला), प्रा.आ.केंद्र.वरखेडा,ता.दिंडोरी यांनी दिनांक 01/10/2018 रोजीच्या अर्जान्वये 90 दिवसाच्या विहीत मुदत्तीनंतर दिनांक 31/12/2018 पासुन स्वेच्छा सेवानिवृतीस परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. श्रीम. छाया पदमाकर वटारे, हया दिनांक 17/12/1984 रोजी आरोग्य सेविका (म) या पदावर हजर झालेले असुन. त्यांची दिनांक 31/12/2018 अखेर एकूण सेवा- 34 वर्षे- 00 महिने- 13 दिवस होणार आहे.

श्रीम. छाया पदमाकर वटारे, आरोग्य सहाय्यिका (महिला) यांचेविरुध्द खातेचौकशी सुरु नाही अथवा प्रस्तावित नाही. त्यांचेकडेस शासकिय / जिल्हा परिषदेचे इतर येणे नसल्याबाबतची तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती, दिंडोरी यांची खात्री झाल्याने तसे दाखले पुरवुन त्यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीसाठी शिफारस केली आहे.

**महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्तीवेतन ) नियम 1982 चे 66 ( 1 ) नुसार श्रीमती. छाया पदमाकर वटारे, आरोग्य सहाय्यिका (महिला) यांना दिनांक 31/12/2018 पासून स्वेच्छा सेवा निवृत्ती घेण्यांस परवानगी देण्यांत येत आहे.**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम- 1982 प्रकरण-1 नियम 6 (2) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्ती होणाऱ्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत सेवानिवृत्ती शेवटची तारीख विनाकामाचा दिवस म्हणून मानण्यात येत असल्याने सदर दिवसाचे वेतन भरणा करण्यात यावे.

सदर आदेशाची नोंद श्रीम. छाया पदमाकर वटारे, आरोग्य सहाय्यिका (महिला) यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**सोबत - मुळसेवा पुस्तक.**

प्रति:- श्रीम. छाया पदमाकर वटारे, आरोग्य सहाय्यिका (महिला), प्रा.आ.केंद्र. वरखेडा,ता.दिंडोरी

प्रत:- **तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी**

2/- श्रीम. छाया पदमाकर वटारे, आरोग्य सहय्यिका (महिला) यांचे मुळसेवा पुस्तक सोबत पाठविणेत येत आहे. तरी श्रीम.वटारे, आरोग्य सहय्यिका (महिला) यांचे मुळसेवा पुस्तक मिळाले बाबत पोहोच या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रतीलिपी:- माहितीस्तव रवाना.**
1) **गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी.**
2) वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र.वरखेडा, ता.दिंडोरी.
3) मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
4) मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग, जि.प.नाशिक